महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेल्या पाणी पुरवठा व मलनि:स्सारण योजनांना अनुदान वितरीत करण्याबाबत. सटाणा नगर परिषद, जि. नाशिक

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुनिअ २०१४/प्र.क्र.४०७/पापु.२२
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: २७ मार्च, २०१८

वाचा :

१. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. नापापु-२००८/प्र.क्र.१/पापु-२२,दि. २२.१०.२००८**
२. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.नापापु-२००८/प्र.क्र.१९८/पापु-२२, दि.२३.१२.२००८**
३. **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.सुनिअ-२००९/प्र.क्र.२०८/पापु-२२, दि.६.८.२००९**
४. **अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नाशिक यांचे पत्र क्र. मजीप्रामंना/ तांशा/२०४९/ २०११, दि.२८.६.२०११**
५. **शासन पत्र क्र. सुनिअ-२०११/प्र.क्र.७/पापु-२२, दि.१०.१.२०११**

प्रस्तावना :

शासन निर्णय, दि.२२ ऑक्टोबर, २००८ अन्वये नागरी पाणीपुरवठा, मलनि:सारण, शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात पर्याप्त, गुणवत्तापूर्ण सेवा, किफायतशीर सेवाशुल्कामध्ये उपलब्ध करुन देणे व विविध तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याचे उदद्दीष्ट निर्धारीत करुन महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान राबविण्यात येत आहे. राज्यातील सर्व नागरीकांना पाणी पुरवठा व मलनि:सारणाच्या सर्वव्यापक सुविधा निश्चितपणे उपलब्ध करुन देणे असा महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

२. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत, शासन निर्णय, दिनांक ६.८.२००९ अन्वये सटाणा शहर पाणी पुरवठा योजनेतील एकूण रु. १४०.०० लक्ष इतक्या किंमतीच्या सुधारणा कामांस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे सदर योजनेस रु.१२६.०० लक्ष अनुदान अनुज्ञेय असुन नगर परिषदेच्या स्वहिश्श्याची रक्कम रु.१४.०० लक्ष आहे. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नाशिक यांनी सटाणा शहर पाणी पुरवठा योजनेतील रु. १०८.९० लक्ष इतक्या निव्वळ किंमतीच्या सुधारणा कामास तांत्रिक मान्यता दिली आहे. सटाणा नगर परिषदेने स्वहिश्श्याची संपुर्ण रक्कम रु.१४.०० लक्ष संबंधित बँक खात्यामध्ये जमा केली असुन संदर्भ क्रमांक ५ अन्वये रुपये ४२.०० लक्ष अनुदान सटाणा नगर परिषदेस वितरीत करण्यात आले आहे. मुख्याधिकारी, सटाणा नगरपरिषद यांनी एकूण रुपये ४२.०० लक्ष रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. उप विभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उप विभाग, मालेगाव यांनी मंजूर सुधारणा कामे ९७.१५% पुर्ण झाली असल्याबाबत भौतिक प्रगती अहवाल सादर केला आहे. मुख्याधिकारी, सटाणा नगर परिषद यांच्या दि.२८.९.२०१२ च्या कार्यादेशाप्रमाणे योजनेची सुधारीत किंमत रुपये १,०३,७०,०३४/- येत आहे. शासन निर्णय दि. २८.७.२००९

प्रमाणे,मंजूर उपांगांपैकी " बिलिंग व वसुलीचे संगणकीकरण " या उपांगाची किंमत रु.७,२८,६०१/- वगळता कार्यादेशाप्रमाणे योजनेची सुधारीत किंमत रु. ९६,४१,४३३/- इतकी येत आहे. त्याप्रमाणे सदर योजनेस रु. ८६,७७,२९०/- अनुदान अनुज्ञेय आहे. सदर योजनेस यापुर्वी रुपये ४२.०० लक्ष अनुदान वितरीत करण्यात आले असून रु. ४४,७७,२९०/- अनुदान वितरीत करणे शिल्लक आहे. सदर योजनेच्या अनुषंगाने सटाणा नगर परिषदेकडून मागविण्यात आलेली काही मुद्यांची माहिती अप्राप्त असल्याने अनुज्ञेय अनुदानापैकी रु. ४,७७,२९०/- राखुन ठेवून उर्वरित रुपये ४०,००,०००/- अनुदान सटाणा नगर परिषदेस वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत, शासन निर्णय, दिनांक ६.८.२००९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या सटाणा शहर पाणी पुरवठा योजनेच्या सुधारणा कामांकरीता अनुज्ञेय अनुदानापैकी रुपये ४०,००,०००/- (रुपये चाळीस लाख फक्त) इतके अनुदान पुढील विवरणानुसार वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम रुपयांत)

शहराचे नाव	योजनेची एकूण किंमत	राज्य शासनाकडून अनुज्ञेय अनुदान (९०%)	नागरी संस्थेने निकषानूसार भरावयाची रक्कम (१०%)	नागरी संस्थेने भरलेली रक्कम	या अगोदर शासनाकडून वितरीत करण्यात आलेले अनुदान	राज्य शासना कडून वितरीत करावयाचे अनुदान
१	२	३	४	५	६	७
सटाणा, जि. नाशिक	९६,४१,४३३	८६,७७,२९०	९,६४,१४३	९,६४,१४३	४२,००,०००	४०,००,०००
एकूण रुपये						४०,००,०००

२. सदर योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुज्ञेय होणाऱ्या सदर अनुदानावरील खर्च मागणी क्रमांक वाय-२, २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा १९२, स्थानिक संस्था, नगर पालिका इत्यादींना सहाय्य - राज्य योजना - (०२) (०२) नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनि:स्सारण योजनांसाठी सहायक अनुदान (२२१५ १६४७), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी सदर लेखाशिर्षाखाली शासनाकडून उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून उक्त विवरणपत्रातील नमूद स्तंभ क्रमांक ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान वितरीत करावे, तसेच अनुदानाच्या या वितरणाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत.

३. संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने योजनेसाठी स्वतंत्र लेखे ठेवावेत आणि योजनेचा प्रगती अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्रे नियमितपणे वेळोवेळी शासनास सादर करावी.

४. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत शासकीय अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत नागरी संस्थानी शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक- नापापु २००८/प्र.क्र.१/पापु-२२ दिनांक २२ ऑक्टोबर, २००८ मधील तरतूदीचा अवलंब करणे आवश्यक राहील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८०३२७१२३२५८३९२८** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sunil Jairam Tumram

Digitally signed by Sunil Jairam Tumram
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873e6409c70b0a0219d717dd6767c9aec9dd2d61ecf0cc982e9e93ef57312675, cn=Sunil Jairam Tumram
Date: 2018.03.27 14:08:46 +05'30'

(सु.ज. तुमराम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

- मा. मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
- मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
- मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
- सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई.
- महालेखापाल १ -मुंबई/नागपूर.
- संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
- विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
- जिल्हाधिकारी, नाशिक
- संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४
- अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नाशिक
- मुख्याधिकारी, सटाणा नगर परिषद, जि. नाशिक
- जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक
- जिल्हा प्रकल्प अधिकारी, (नगरपालिका) जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
- वित्त विभाग/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
- कक्ष अधिकारी, पापु.०४,पापु.२०,पापु.२१, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
- निवडनस्ती, पापु-२२.